**Set - A**

| CBSE X | **MT EDUCARE LTD.** | Marks : 80 |
|---|---|---|
| | SUBJECT : MARATHI | |
| | **SEMI PRELIM - I** | |
| Date : | **MODEL ANSWER PAPER** | Time : 3 hrs. |

**खंडः 'क'**

**A.1.**

१. पाहुणा **1**

२. सर्वसामान्यपणे व्यक्तीच्या जीवनावर आई किंवा वडिलांचा प्रभाव पडतो. **1**

३. जन्मपूर्व अवस्थेपासून माणसाला पाय फुटेपर्यंत तो आईच्या पुढ्यात असतो. त्या वयात आधाराशिवाय जगता येत नाही त्या वयात आई हाच एकमेव आधार असतो. त्यामुळेच त्या बाळाचे जीवन ही 'आई' या वृक्षाची पारंबी असते. **2**

४. आई कधी नोकरी करणारी असते तर कधी नोकरी करणारी नसते. त्यामुळेच तिचे कधी वेगळे उत्पन्न असते तर कधी नसते. आपल्या वेगळेपणाचा त्याग करून मोकळेपणाने घरासाठी ती सर्वस्व अर्पण करत असते. तिच्याकडे कोणाचे लक्ष नसले तरी ती सर्वांकडे लक्ष देते. सर्वांचे भरणपोषण करते म्हणून आईला 'गृहदेवता' म्हटले आहे. **2**

**A.2.**

१. शेतीवर **1**

२. लालबहादूर शास्त्रीजींनी 'जय जवान, जय किसान' अशी घोषणा केली. **1**

३. सैनिक व शेतकरी यांना देशाचे दोन आधार मानले गेले. कारण सैनिक ज्याप्रमाणे, प्राणांचे बलिदान करून देशाचे रक्षण करतात त्याच प्रमाणे शेतकरी अत्यंत कष्ट करून शेतात धान्य पिकवतात. **2**

४. शेतकऱ्यांना सुविधा पुरविल्या जात नाही. बी-बियाणे पुरविले जात नाही. आधुनिक यंत्रे, खतांचा पुरवठा या सर्व गोष्टींकडे सरकारचे व समाजाचे लक्ष नाही. यासाठी शेतकऱ्यांना कर्ज काढावे लागत आणि ते कर्जबाजारी होतात. **2**

**खंडः 'ख'**

**A.3.** **खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा.**

१. **निसर्ग - माझा सोबती** **7**

'निसर्ग माझा सोबती
रममाण मी निसर्ग संगती
डोंगर, दऱ्या मने हिंडती
तरंगलहरी मी नदी-सागरी'

माणसाला आपल्या पंखाखाली घेऊन, जगण्याचे सौख्य देणारा निसर्ग हा मानवाचा जवळचा सोबती आहे. निसर्गाच्या हातामध्ये विश्वासाने आपला हात गुंफून

घेतला की जगण्यातील मौज अनुभवता येते. निसर्गाच्या सहवासात मानवाला समाधान मिळते.

निसर्ग हा मानवाच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. तो आपला दाता आहे. त्याच्याशिवाय आपले अस्तित्वच शून्य आहे. म्हणूनच निसर्गाचे रक्षण करणे हे मानवाचे परमकर्तव्य आहे. परंतु मानवाने स्वतःच्या स्वार्थी वृत्तीमुळे निसर्गाकडे दुर्लक्ष केले आहे. गरजेपेक्षा अधिक उपयोग करून निसर्ग वैभवाची लूट सुरू आहे. निसर्गाचे सौंदर्य जपले पाहिजे. निसर्गाचा तोल सांभाळला पाहिजे. सदाहरीत निसर्ग माणसाचे मन प्रफुल्लित करतो व त्याला खरीखुरी शांतता देतो. निसर्गरूप हे भव्यदिव्य व पुजनीय आहे. म्हणूनच श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वताची पुजा केली. आर्यांच्या काळातही निसर्ग देवता पुजनीय होत्या. म्हणून आपणही निसर्गाशी नाते जोडले पाहिजे.

निसर्गाने माणसाला अगदी भरभरून दिले आहे. निसर्ग निःस्वार्थी वृत्तीने आपल्याला सगळे देत असतो. माणूस सतत आपला स्वार्थ साधत असतो. वृक्षतोड करतो, इमारती, बंगले बांधण्यासाठी जंगलतोड करतो. माणसाचे हे कृत्य पृथ्वीच्या नाशास कारणीभूत ठरत आहे. प्रदुषणाचे प्रमाण वाढले आहे. जर हे असेच सुरू राहिले तर पृथ्वीचा विनाश अटळ आहे. कळतनकळत मनुष्य आपल्या जीवनाचाच विनाश करीत आहे, ही गोष्ट मानवाच्या लक्षात येत नाही. म्हणूनच म्हणावेसे वाटते.....

‘निसर्ग संगती सदा घडो
मंजूळ पक्षीगान कानी पडो
कलंक प्रदुषणाचा झडो,
वृक्षतोड सर्वथा नावडो’

निसर्ग हा दानशूर आहे. निसर्ग बोलत नाही तो कृती करतो. फळाफुलांनी लगडलेली झाडे वेली पाहिली की त्याच्या दानशूरतेची कल्पना येते. माणूस कधी-कधी विषमतेने वागतो पण निसर्ग तसे करत नाही. तो कोणताच भेदभाव कधीच करत नाही. म्हणूनच निसर्ग हा मला माणसापेक्षा जवळचा सोबती वाटतो.

अथांग समुद्र, विशाल गगन, विस्तीर्ण डोंगररांगा, उत्तुंग पर्वत, खोल दऱ्या, वाहणाऱ्या नद्या, झाडांचे, पानाफुलांचे विविध रंग, आकार अशी निसर्गाने खूप किमया केली आहे. वाऱ्यावर डोलणारी हिरवीगार झाडे, मंजूळ गीते गाणारे पक्षी, रंगीबेरंगी फुलपाखरे हे सारेच आपले जीवाभावाचे मित्र आहेत. उमलणारी फुले, बहरलेली झाडे मनाला आनंद देतात. त्यांच्या सानिध्यात, त्यांच्या रंगाने, गंधाने आपले मन प्रसन्न होते. आपण आपले दुःख विसरून जातो. निसर्ग आपल्याला भरभरून देत असतो ते घ्यायला आपले दोन इवले हात अपुरे पडतात. त्यामुळे निसर्गाचे संवर्धन केले तरच पृथ्वी वाचेल व मानवाचे अस्तित्व टिकून राहील. त्यामुळे पर्यावरण संतुलनाचा वेळीच विचार करून त्याची अंमलबजावणी व्हायला हवी.

निसर्गासारखा मित्र आपणास कधीच लाभणार नाही. आपल्या आयुष्यात जशी जवळची माणसे आनंद व प्रकाश देतात. तसाच निसर्गसुद्धा ते सुख देत असतो. म्हणूनच निसर्गाशी मैत्री टिकवून ठेवताना म्हणावेसे वाटते .......

‘निसर्ग, निसर्ग तू आहेस माझा सोबती
जन्मभर होतील ना तुझ्या माझ्या गाठीभेटी
तुझ्या सानिध्यात राहून मन झाले आहे निर्मळ
असे वाटते राहावे नेहमी तुझ्याजवळ.’

| | | |
|---|---|---|
| २. | **मला देव भेटला तर ....**<br>'देव जरी मज कधी भेटला,<br>माग हवे ते माग म्हणाला,<br>म्हणेन प्रभू रे माझे सारे,<br>जीवन देई मम बाळाला ।'<br>चित्रपटातील हे सुमधुर गीत आकाशवाणीवर ऐकताना माझ्या मनात अशी रम्य कल्पना स्फुरली की खरोखरच मला देव भेटला तर काय बहार येईल... तेवढ्यात आवाज आला, 'तथास्तु'.<br>मी क्षणभर अवाक्‌च झालो, क्षणभर सुचेना, काय करावे? देव तर प्रत्यक्ष समोर मंद हास्य करत उभे राहिलेले. मला गोंधळलेले पाहून हसतच म्हणाले, 'बोल वत्सा, काय हवंय तुला?' त्यांच्या दिव्य तेजाने मी दीपून गेलो. थोडे सावरताच मनातील सर्व प्रश्न विचारू लागलो, 'देवा, आम्ही सगळी तुझी लेकरे असताना समाजात अशी विषमता, भेदभाव का? कोणी काळा, कोणी गोरा तर कोणी श्रीमंत तर कोणी गरीब का? का सगळे स्वार्थासाठी आपापसात भांडतायत, एकमेकांचा जीव घेतायत, सांग देवा, सांग हे असं का?<br>देव गालातल्या गालात हसतच मला म्हणाले, 'अरे मूढा! मी फक्त माणूस घडवला पण भेद तर तुम्हीच निर्माण केलेत. तुम्हीच एकमेकांच्या जीवावर उठलात. परंतु त्याचे खापर मात्र तुम्ही माझ्या डोक्यावर फोडताय. अरे! मी दगडरूपी मूर्तीत नाही तर हृदयरूपी देव्हाऱ्यात वसतो. मी संगमरवरी मंदिरात नाही तर कष्टकऱ्यांच्या शेतात राहतो. घंटानादाच्या निनादात नाही तर तुमच्या मेहनतीत रमतो. पण तुम्हीच मला देव्हाऱ्यात कोंडलय, स्वतःच्या फायद्यासाठी. श्रम न करता तुम्हांला सगळं हवं म्हणून तुम्ही नवस बोलता, वेळेला लाच देण्याचा प्रयत्न करता. मी तुम्हांला जन्माला घातलं ते या सुंदर सृष्टीमध्ये नंदनवन फुलवण्यासाठी पण त्याठिकाणी तुम्ही अनेक धर्म निर्माण केले. त्यासाठी वेगवेगळ्या रूपात येऊन मी तुम्हांला मार्गदर्शन केलं. तुम्ही त्याचा स्वार्थासाठी उपयोग करताय हा काय माझा दोष आहे? म्हणजे तुमचं हे बरं आहे.'<br>'देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे,<br>घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे।।'<br>'विनाशकाले विपरित बुद्‌धी' या उक्तीप्रमाणे मानवाने स्वतःच आपला विनाश ओढवून घेतला आहे. जन्मदात्या मातेला ती स्त्री आहे म्हणून अधर्माने तिच्या प्रगतीला अडविले आहे. स्पृश्य-अस्पृश्यतेच्या भिंती उभ्या केल्या, मंदिर-मस्जिद वाद रंगविले. नाव मात्र दिलेत धर्माचे. पण बदनाम केलेत ते देवाला. सुखात नाही तर फक्त दुःखात देवाची तुम्हांला आठवण येते. स्वार्थासाठी अगदी आमची विटंबना करायलाही तुम्ही धजावता. सत्तेच्या लोभापायी युद्ध करता. शांततेसाठी व विकासासाठी दिलेली अणुऊर्जा विनाशकारी बॉम्ब बनवण्यास वापरून प्रचंड जीवितहानी घडवून आणता. अगदी स्टार वॉरची योजना आखता व मौल्यवान खनिजांचा दुरूपयोग करता. पण लक्षात ठेवा, यात विनाश तुमचाच आहे. वाढत्या जागतिक तापमानाची दखल घ्या नाहीतर विनाश अटळ आहे. | 7 |

'नकोत मंत्र मला मुनीब्राह्मणांचे, मला आवडे गीत श्वासाघणांचे
वसतो सदा मी स्वेद गंगेकिनारी, जिथे राबती हात तेथे हरी ।'

''तेव्हा स्वार्थी माणसा जगाच्या कल्याणासाठी स्वार्थ सोडून दे.'' एवढं बोलून देव मला प्रश्नांच्या गर्तेत लोटून अंतर्धान पावले.

'तोचि करता आणि करविता' या उक्तीप्रमाणे त्या देवावरच सगळं सोपवून मी समर्थांच्या ओळी मनात घोळवू लागलो,

'राघवाचा धर्म जागो, अधर्म रे भागो,
अज्ञान निरसुनिया, विज्ञान लक्ष लागो।।'

३. **एका वृद्धाचे मनोगत** 7

'माझ्या छोट्या मित्रांनो, आज तुम्ही तुमचा सहलीचा दिवस आमच्या वृद्धांच्या आश्रमात म्हणजे आमच्या सर्व वृद्धांच्या सहवासात घालविला, त्याबद्दल प्रथम मी तुमचे मनःपूर्वक आभार मानतो आणि कौतुक देखील करतो. तुम्हांला आम्हा सर्वांना पाहून नक्कीच तुमच्या आजी-आजोबांची आठवण झाली असेल. मुलांनो, येथील काही मंडळी ही स्वखुषीने आलेली आहेत, तर काही मंडळींना त्यांच्या मुलांनी अडगळ म्हणून इथे आणून टाकले आहे. तर काहींना परिस्थितीमुळे या वृद्धाश्रमाचा आसरा घ्यावा लागला आहे.

आता माझेच बघा ना. मी तरूण वयात असताना मुलांसाठी किती खस्ता खाल्ल्या, त्यांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले. मला दोन मुलगे व एक मुलगी. तिघांची शिक्षणे पूर्ण केली. त्यांची लग्ने करून दिली. आणि आता माझ्या निवृत्तीनंतर... मुलांना मात्र घरात आर्थिक टंचाई भासू लागली. म्हणून मुलांनी मला व माझ्या अर्धांगिनीला वेगळे केले. म्हणजेच एका मुलाने मला सांभाळायचे ठरविले आणि एका मुलाने माझ्या पत्नीला. खरंतर आज याच काळात मला तिच्या मानसिक आधाराची गरज आहे. जिने मला लग्नानंतर बरोबरीने साथ दिली, तिच आज या स्वार्थी मुलांमुळे माझ्यापासून दुरावली गेली. मुलांचे हे वागणे मला व तिला काही सहन झाले नाही आणि म्हणूनच आम्ही दोघांनी मिळून स्वतः या वृद्धाश्रमाचा आसरा घेतला. ही सारी स्वार्थी, मतलबी, तरूण मंडळी हे ही सोयीस्करपणे विसरतात की, एक दिवस आपण ही वृद्धच होणार आहोत आणि मग आपली मुलेबाळे ही आपल्याला असेच येथे आणून सोडतील.' आम्ही दोघांनी मुलांसाठी किती कष्ट काढले आहेत. उपासतापास करून व्रतवैकल्ये, नवससायास करून त्यांना मोठे केले, चांगले शिक्षण देऊन शिकविले. आमच्या आशा-आकांक्षांवर पाणी सोडले आणि आज त्याच मुलांनी आम्हांला घराबाहेर पडण्याची वेळ आणली. असो.......

पण आता तुम्ही माझेच मित्र देसाई यांच्याबद्दल पहा ना. ते तर स्वखुषीने या आश्रमात आले. खरं तर त्यांचे दोन्ही मुले परदेशात उच्च पदांवर काम करतात. पण त्यांच्यामते आपण मुलांच्या प्रपंचात लुडबुड करायची नाही. जोपर्यंत हातपाय चालतात, तोवर आपण समवयस्क अशा वृद्धांची सेवा करायची आणि समाधानाने हे जीवन जगावे.

पण मुलांनो, मी आता दुःखी अजिबातच नाही. कारण आता मी माझ्या पत्नीबरोबर या

वृद्धाश्रमात राहत आहे आणि बरोबर हा माझा मित्र. कारण त्याच्या विचारांनी देखील मी प्रेरित झालो आहे. मलासुद्धा मनापासून वाटते की, या वार्धक्यातही आपण कोणासाठी तरी उपयोगी पडू शकतो. हे फार मोठे समाधान आहे. पण कुटुंबियांकडून, समाजाकडून वृद्धांची केली जाणारी उपेक्षा पाहून माझे अंतःकरण वेदनेने तळमळते.

खरे तर वार्धक्य हे अटळ आहे. म्हणून ते शाप न ठरता वरदान कसे ठरेल, याचा विचार आम्ही वृद्धांनी स्वतःच केला पाहिजे. यासाठी आम्ही वृद्धांनी स्वतःहून स्वतःला सवय लावून घेतली आहे. ती म्हणजे मर्यादित आहार व नियमित व्यायामाची आणि त्यामुळेच आम्ही आमचे उर्वरित आयुष्य सुखाने जगू याचा मला ठाम विश्वास आहे.

किंवा

**<u>बळी तो कानपिळी</u>**

एक घनदाट जंगल होते. त्या जंगलात एक सिंह, कुत्रा व कोल्हा यांची मैत्री जमली. **7**
शिकारीबाबत त्यांनी आपापसात एक करार केला. तो असा की, तिघांनी मिळून शिकार करायची आणि तिची आपापसात समान वाटणी करायची.

एके दिवशी कुत्र्याला एक हरीण दिसले. त्याने हरणाचा पाठलाग केला व त्याला कोल्हा जिथे लपून बसला होता तिथपर्यंत आणले. कोल्ह्याने त्या घाबरलेल्या हरणाला धीर दिला व म्हणाला, तू अजिबात काळजी करू नकोस. चल माझ्याबरोबर, असे म्हणून त्या भेदरलेल्या हरणाला कोल्हा सिंहापर्यंत घेऊन आला. सिंहाने हरणावर झडप घातली व त्याला ठार केले.

सिंहाला वाटले आपण हरणाची शिकार केली म्हणून ती शिकार आपल्यालाच मिळावी. कुत्र्याला वाटले आपण हरणाला कोल्ह्यापर्यंत पाठलाग करून आणले म्हणून ती शिकार आपल्याला मिळावी आणि कोल्ह्याला वाटले आपण हरणाला सिंहापर्यंत घेऊन आलो म्हणून ही शिकार आपल्याला मिळाली पाहिजे.

कराराप्रमाणे शिकारीचे तीन वाटे करण्यात आले. सिंहाला हे कबूल नव्हते. त्याला सगळी शिकार हवी होती. त्याने एक युक्ती काढली.

सिंह कोल्हा व कुत्र्याकडे आला आणि म्हणाला, मी या जंगलाचा राजा आहे. मी जर नसतो तर ही शिकार झाली नसती. त्यामुळे संपूर्ण शिकार मलाच मिळाली पाहिजे. असे म्हणून त्याने कुत्रा व कोल्हा यांचा वाटाही घेतला. बिचारे दोघेही एकमेकांकडे बघतच बसले. कुत्रा व कोल्हा हे सिंहापेक्षा दुबळे व अशक्त असल्याने बिचाऱ्यांना शिकार दाखवूनही त्यादिवशी उपास घडला.

**<u>तात्पर्य</u> : ताकदवान माणसे नेहमीच दुबळ्यांवर राज्य करतात.**

**A.4. खालील विषयावर पत्र लिहा.** **5**

दिपक काळे
सहल प्रमुख,
सरस्वती विद्यालय,
तुळशीबाग, पुणे.
दि. २७ नोव्हेंबर, २०१७

प्रति,
मा. आगार व्यवस्थापक,
महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ,
पुणे.

विषय – अजिंठा-वेरूळ येथील सहलीसाठी स्वतंत्र बससेवा मिळण्याबाबत.

माननीय महाशय,

सप्रेम नमस्कार.

मी दिपक काळे, वरील शाळेचा सहलप्रमुख या नात्याने हे पत्र लिहित आहे. आमच्या शाळेतील दिडशे विद्यार्थी व दहा शिक्षक डिसेंबर महिन्याच्या चौथ्या आठवड्यात औरंगाबाद येथील ‘अंजिठा - वेरूळ’ या ठिकाणी सहलीसाठी जाण्याच्या बेतात आहेत.

आम्हाला या शैक्षणिक सहलीसाठी तीन बसेसची गरज आहे. तरी कृपया आपण आम्हाला ही बससेवा उपलब्ध करून द्यावी. सहल साधारणतः चार दिवसांची असल्याकारणाने बसेस चारही दिवस आमच्याबरोबर मुक्कामाला राहतील याची नोंद घ्यावी. तेव्हा आपण ही बससेवा आम्हाला हव्या असलेल्या तारखेस उपलब्ध करून देऊ शकाल की नाही ? हे कृपया कळवावे. तसेच सर्व व्यक्तींचा एकूण किती भाडेखर्च येईल व आगाऊ रक्कम किती भरावी लागेल, तेही जरूर कळवावे, ही नम्र विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला नम्र,
दिपक काळे
(सहलप्रमुख)

तिकीट

प्रति,
मा.आगार व्यवस्थापक,
महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ,
पुणे.

प्रेषक,
दिपक काळे
सहलप्रमुख,
सरस्वती विद्यालय,
तुळशीबाग, पुणे.

किंवा

कृणाल माने 5
१३५,साईसदन,
सदाशिव पेठ,
पुणे.
दि.५ जून,२०१८

प्रति,
मा.आरोग्य अधिकारी,
आरोग्य विभाग,
पुणे महानगरपालिका,
पुणे.

विषय – रस्त्यावरील कचरापेटीच्या दुर्दशेबाबत तक्रार पत्र.

माननीय महाशय,

सप्रेम नमकार.

मी कुणाल माने, सदाशिव पेठ, पुणे येथे राहतो. माझ्या घरासमोरच महानगरपालिकेतर्फे कचऱ्यासाठी एक पेटी ठेवलेली आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की, विभागातील लोक कचरा टाकताना तो कचरापेटीतच पडेल याची थोडीही काळजी घेताना दिसत नाहीत. त्यामुळे जवळपास सर्वच कचरा पेटीच्या बाहेर पडलेला असतो. कचरा जमा करणारे तर तो आणखीनच इकडे-तिकडे पसरवतात. भटकी कुत्री रात्रभर तेथेच गोळा होऊन जोरजोरात भुंकत असतात.

शिवाय आपल्या महानगरपालिकेतर्फे येणारी कचरा उचलणारी गाडी दोन ते तीन दिवसांनी येते. त्यामुळे बराच कचरा जमा होतो व भयंकर दुर्गंधी त्याला सुटलेली असते. त्यामुळे विभागातील लोकांचे आरोग्य बिघडेल अशी चिंता आम्हाला लागलेली आहे.

तरी आपण कृपया या गोष्टीकडे वैयक्तिक लक्ष देऊन यातून आमची सुटका करावी, ही नम्र विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विश्वासू,
कृणाल माने

| | | |
|---|---|---|
| | तिकीट<br><br>प्रति,<br>मा.आरोग्य अधिकारी,<br>आरोग्य विभाग,<br>पुणे महानगरपालिका,<br>पुणे.<br><br>प्रेषक,<br>कृणाल माने<br>१३५, साईसदन,<br>सदाशिव पेठ, पुणे. | |
| | **खंड 'ग'** | |
| **A.5.** | **अ) खालील प्रश्नांची उत्तरे कंसातील सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही चार)** | |
| १. | **पण** - उभयान्वयी अव्यय | **1** |
| २. | सर्वनाम - **तिने** | **1** |
| ३. | क्रियापद - **वाढले** | **1** |
| ४. | केवलप्रयोगी अव्यय - **शाब्बास !** | **1** |
| **A.5.** | **आ) पुढील वाक्ये कंसातील सूचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही दोन)** | |
| १. | कर्तरी प्रयोग | **1** |
| २. | कर्मणी प्रयोग | **1** |
| ३. | तुम्ही कधीतरी ऐकाच. | **1** |
| ४. | आपल्यासारख्या सामान्यांना शब्दावाचून संवाद भावणार आहेत का ? | **1** |
| **A.5.** | **इ) पुढील वाक्यातील काळ ओळखा. (कोणतेही दोन)** | |
| १. | भूतकाळ | **1** |
| २. | वर्तमानकाळ | **1** |
| ३. | भविष्यकाळ | **1** |
| **A.5.** | **ई) पुढील शब्दांचे लिंग बदला.** | |
| | १. आई - वडील     २. मामा - मामी | **1** |
| | ३. बादशहा - बेगम     ४. मित्र - मैत्रीण | **1** |
| **A.5.** | **उ) पुढील शब्दांचे वचन बदला.** | |
| | १. खुर्ची - खुर्च्या     २. घर - घरे | **1** |
| | ३. व्याख्यान - व्याखाने     ४. पत्र - पत्रे | **1** |

| | | |
|---|---|---|
| **A.5.** | **ऊ) पुढील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** | |
| | १. झाड - वृक्ष, तरू     २. ठिकाण - स्थळ | **1** |
| | ३. नारळ - श्रीफळ     ४. हर्ष - आनंद | **1** |
| **A.5.** | **ए) पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** | |
| | १. संवाद × विसंवाद     २. सुंदर × कुरुप | **1** |
| | ३. गरीब × श्रीमंत     ४. मान × अपमान | **1** |
| | **खंड 'घ'** | |
| **A.6.** | **अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही चार)** | |
| १. | दोन **<u>विद्‌वान</u>** माणसांची गोष्ट सांगतात. | **1** |
| २. | माझं मन या ऋतूमधल्या नव्या वळणाबरोबर **<u>धुमारल्यासारखं</u>** चैतन्यमय झालं आहे. | **1** |
| ३. | १९७३ ला **<u>सोव्हियत रशिया</u>** तर्फे 'सोव्हिएत लॅंड नेहरू पुरस्कार' त्यांना मिळाला. | **1** |
| ४. | रविवर्मा त्या **<u>तेजःपुंज</u>** व्यक्तिमत्त्वाकडे भारल्यासारखा पाहत होता. | **1** |
| ५. | कवी यशवंतांच्या एका कवितेचा **<u>संदर्भ</u>** आला. | **1** |
| ६. | मास्तरांची **<u>कविता</u>** तेरावी, चौदावीची मुलं अभ्यासत होती. | **1** |
| **A.6.** | **आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही सहा)** | |
| १. | स्वामीजी अनाहूतपणे परस्थांच्या घरी जात नसत. | **1** |
| २. | नारायण सुर्वे 'लोकवाङ्मयगृह' मासिकाचे संपादक झाले. | **1** |
| ३. | वसंत ऋतूचा वसंतोत्सव साजरा करावा, असे लेखिकेला वाटते. | **1** |
| ४. | दोन्ही विद्‌वान म्हणजे 'संवाद' या संकल्पनेची परमोच्च आदर्शावस्था म्हटली पाहिजे. | **1** |
| ५. | 'सतलज' नदी रारंग ढांगला वळसा घालून वाहते. | **1** |
| ६. | 'घनचक्कर समाज' हे नाव लेखकाचे वडील दादा धर्माधिकारी यांनी सुचवले. | **1** |
| ७. | शहरात चैत्रगौरीच्या हळदीकुंकवाचं प्रमाण कमी झालेले दिसतं. | **1** |
| ८. | जितकी ओळख कमी, जितके व्यक्तिविषयक संदर्भांचे, तपशीलाचे ज्ञान अपुरे, तितक्या इतरांबरोबर गप्पा अधिक रंगतात. | **1** |

**A.7.** अ) आकृतिबंध पूर्ण करा. (कोणतेही तीन)

१. **2**

**लेखिकेच्या मते, मित्रमंडळींशी मोकळा संवाद न होण्याची कारणे**

- एकमेकांचे गुणदोष
- जीवनातले बरेवाईट तपशील
- जवळिकीमुळे चमत्कारिक अवघडलेपण
- एकमेकांची मते, आग्रहदुराग्रह
- वृत्तीतल्या हळव्या जागा, स्वाभिमानाची ठिकाणे
- क्षुल्लक कारणांमुळे होणारा गैरसमज

२. **2**

| **लेखकाच्या आईचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग** | | |
|---|---|---|
| साल | १९४१ | १९४२ |
| आंदोलन | वैयक्तिक सत्याग्रह | भारत छोडो |

३. **2**

**स्वामी विवेकानंद अनाहूतपणे राजा रविवर्म्याच्या घरी येण्याचे कारण**

- कौतुक करण्यासाठी
- अभिनंदन करण्यासाठी

४. **2**

**मास्तर व जबाबदाऱ्या**

- **सांभाळल्या** — साहित्य क्षेत्रातील
- **सांभाळल्या नाहीत** — घरातल्या संसारातल्या

५. 

2

आ) **खालील प्रश्नांची ३० ते ४० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१. एखाद्या व्यक्तीबरोबर असलेली ओळख जितकी कमी तितके त्या व्यक्तिविषयक संदर्भाचे, तपशीलाचे ज्ञान अपुरे असते. त्यामुळे गप्पा अधिक रंगतात. कारण पुढ्यातले माणूस कोण आहे हे आपल्याला ठाऊक नसते आणि आपण कोण याची समोरच्या माणसाला कल्पना नसते. ती केवळ एक जुजबी ओळख असते. नाव, गाव, पत्ता, व्यवसाय सोडल्यास बाकीचे तपशील, स्वभाववैशिष्ट्ये, त्यांचे आग्रहदुराग्रह याबाबत दोघांनाही माहिती नसते. तसेच मतभेद होणे, मन दुखावले जाणे यांसारख्या गोष्टी अशा संवादात घडत नाहीत. त्यामुळे अशा संवादात एक वेगळेच मोकळेपण अनुभवायला मिळते. 3

म्हणून जितकी ओळख कमी, जितकी व्यक्ती अपरिचित तितका संवाद अधिक रंगतो, असे म्हटले आहे.

२. स्वामीजी आसनस्थ झाल्यावर गोदवर्मा, राजा रविवर्मा व रामय्या यांनी त्यांची पाद्यपूजा केली. हे सर्व चालू असताना चेतू रविवर्म्याला आत येण्याबद्दल खुणावत होता. त्रस्त मनानं रविवर्मा आत गेला. आत जाताच चेतूने रविवर्म्याचे पाय धरले. त्याला उठवत संतापाने रविवर्म्याने त्याला दटावले. त्यावर चेतू डोळ्यांतील पाणी पुसत म्हणाला, 'स्वामी तुमच्यामुळे देवदर्शन घडलं आहे. त्यांना आज घरात ठेवून घ्या. माझ्या गरिबाच्या हातचे चार घास त्यांनी स्वीकारले तर माझी कुळी उद्धरेल.' हे सारं सांगताना चेतूचे शरीर गदगदा हलत होते. चेतूची अवस्था पाहून व्याकुळ झालेला रविवर्मा त्याला बळजबरीने स्वामीजींच्या समोर घेऊन आला. स्वामीजींना पाहताच चेतूने त्यांना साष्टांग नमस्कार घातला व 'आपण हो म्हटल्याखेरीज हे पाय सोडणार नाही.' असे म्हणत त्यांच्या पायांशी तसाच पडून राहिला. 3

अशाप्रकारे स्वामी विवेकानंदानी आपल्या हातचे भोजन स्वीकारावे म्हणून चेतूने आग्रह केला.

३. निसर्ग सौंदर्य अनुभवायचे असेल तर केवळ त्याचे फोटो काढून पाहिले तर उपयोग नसतो. फोटोवरून त्याची कल्पना येणे शक्य नसते. म्हणूनच लेखकाच्या मते निसर्गचित्र म्हणजे केवळ निसर्गदृश्य नसते. निसर्गाशी संवाद साधला तर निसर्ग आपणहून आपल्याशी बोलतो. 3

| | | |
|---|---|---|
| | नदीच्या प्रवाहाचा सतत चाललेला आवाज, पर्वतावरचा दगड त्या ओघात पडल्यावर उसळणाऱ्या पाण्याचा आवाज, पहाटेच्या वेळी पक्ष्यांची किलबिल, रात्री रातकिड्यांची किरकिर, मेघांचा गडगडाट, क्षणात चमकून जाणाऱ्या विजेचा कडकडाट, कधी वाऱ्याची भणभण तर कधी नुसतीच पानांची सळसळ हे सारे निसर्गाशी संवाद साधल्यावरच अनुभवायला मिळते. | |
| ४. | वसंत ऋतू सुरू झाला की हवामानात होणारा बदल जाणवतो. थंडी निरोप घेता घेता उत्तररात्रीपुरती सोबत करते आणि दिवसा उन्हाळ्याची ललकारी देणारी उन्हाची तीव्रता चटके देऊ लागते. एकीकडे पतझड सुरू होते. अंगण, रस्ते पिवळ्या धम्मक पण वाळक्या पानांनी भरून जातात. तर दुसरीकडे अशोकाची, वरूणाची, शिरिषाची अशी अनेक झाडे तेजस्वी पानांनी झगमगून उठतात. आंब्याचा मोहोर, कोकिळेच्या लकेरी, उसाची गुऱ्हाळं, कलिंगडांचे ढीग, द्राक्षांचे घोस या सगळ्यांमुळे वसंत ऋतूच्या आगमनाची चाहूल लागते. अशा या वातावरणात लेखिकेचे मनही उत्साही होऊन जाते. | 3 |
| **A.8.** | **अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा. (कोणतेही चार)** | |
| १. | **जीवा** सुख झालें । माझें माहेर भेटलें ॥ | 1 |
| २. | तिथे अन्न होऊन ठाकेल **श्याम** ! | 1 |
| ३. | करीं **भक्तांचा** सांभाळु । अनाथांचा तू कृपाळू ॥ | 1 |
| ४. | कां ही **वासना** न सुटे यांची । | 1 |
| ५. | असे विश्वकर्मा **श्रमांचा** पुजारी. | 1 |
| ६. | भावमय किमया ही **हृदयीच्या** दौलतीची? | 1 |
| **A.8.** | **आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** | |
| १. | कवीच्या मते चिमण्यांच्या ओठी खुले हसणे दिसेल. | 1 |
| २. | सावळ्या रूपातील श्यामला श्वासा-घणांचे गीत आवडते. | 1 |
| ३. | जन्मोजन्मी माणसाची फजिती होईल. | 1 |
| ४. | पांडुरंग भक्तांचा सांभाळ करतो. | 1 |
| ५. | कवितेतील घरट्यात बालरवि-किरणांची प्रभावळ नाचते. | 1 |
| **A.9.** | **अ) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.** | |
| १. | कवीच्या घरात सप्तसूरांचा झंकार नसून, एकस्वरात मंद्र सप्तकात गाणारी एकतारी आहे. म्हणजेच घरातील माणसांचा एकमेकांशी वाद नसून सुसंवाद आहे. त्यांच्या विचारामध्ये एकोपा दिसून येतो. साऱ्यांची मने उमजून घेतल्यामुळे घरात सौख्याचे, समाधानाचे वातावरण आहे. | 3 |
| २. | संतांच्या सान्निध्यात राहिल्यामुळे मनातील वाईट विचारांचा नाश झाला आहे व मनाला शांतता लाभली. संतचरण दिसल्यामुळे मनाचा व शरीराचा सारा थकवा दूर झाला | 3 |

आहे, असे सेना महाराज म्हणतात. संतांची भेट झाल्यामुळे सेना महाराज यांना खूप आनंद झाला आहे. संतसंग लाभल्यामुळे दिवाळी-दसऱ्यासारखे सण-उत्सवाचे वातावरण त्यांच्या घरी निर्माण झाले आहे.

३. परमेश्वराला मुनिब्राह्मणांचे होम-हवन, मंत्र-तंत्र अजिबात आवडत नाहीत. त्याला श्वासांचे-घणांचे गीत आवडते. म्हणजेच मेहनत करताना श्रमिकांच्या होणाऱ्या श्वासांचा आवाज, हातोड्याची (घणांची) ठकठक, जणू हे गीत त्याला आवडते. असा हा परमेश्वर नेहमी घामरूपी गंगेच्या किनाऱ्यावरच म्हणजेच जिथे घाम गाळून कष्ट केले जातात तेथे राहतो. **3**

**A.9. आ) आकृतिबंध पूर्ण करा. (कोणतेही दोन)**

१. **2**




२. **2**




३. **2**




**A.10. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१. लेखक हायस्कूलमध्ये शिकत असताना त्याला गुळाच्या गाड्यांबरोबर जावे लागे. शाहूपुरीतील अडत दुकानात उतरून गुळाचा हिशोब घेऊन येण्याची जबाबदारी वडिलांनी त्याच्यावर सोपवलेली होती. कोल्हापुरात त्यावेळी गुऱ्हाळांचा एक विशिष्ट काळ असे. हा गूळ 'कोल्हापुरी गूळ' म्हणून प्रसिद्ध होता. तो खरेदी करण्यासाठी गुजरातहून व्यापारी मंडळी येत. कोल्हापुरी गुळाची चव खास आहे. हा ताजा गूळ शाहूपुरीत सर्वत्र ढेपाढेपांनी रचलेला दिसे. त्याचा गंध आल्यानंतर तो खाण्याचा मोह कोणालाही होई. त्याचा रंगही असाच मनाला आकर्षित करणारा असे. कोल्हापुरी गुळाच्या चवीचे आणि रंगगंधाचे हे वैशिष्ट्य या पंचक्रोशीतील 'माती'च्या गुणातूनच निर्माण झालेले आहे. **2**

अशाप्रकारे लेखकाने कोल्हापुरी गुळाचे वर्णन केले आहे.

| | | |
|---|---|---|
| २. | भारत हा जसा संतांचा देश म्हणून ओळखला जातो तसाच तो नद्यांचा देश म्हणूनही ओळखला जातो. पाणी हा निसर्गाने मानवाला दिलेला अतिशय अमुल्य असा ठेवा पण जो आता माणसांच्या चुकांमुळेच नष्ट होत आहे.<br>खेड्यापाड्यांत पाण्याची समस्या दिवसेंदिवस अधिकाधिक बिकट होत आहे. आपल्या देशातील पावसाच्या पाण्यापैकी ८०टक्के पाणी वाहून जाते. त्यामुळे आजच्या स्थितीत 'पाणी अडवा पाणी जिरवा ही योजना राबवणे खरंच गरजेचे आहे.<br>त्यासाठी सर्व नद्यांवर धरणं बांधणे, सर्व नद्यांना एकमेकांशी जोडणे, जमिनीखालील पाण्याच्या पातळीत वाढ करणे, जमिनीची धूप थांबवणे, झाडे लावणे, जलप्रदुषणाला आवर घालणे यासारखे कार्यक्रम हाती घेणे गरजेचे आहे. | **2** |
| ३. | प्रत्येक गावाची आपली एक संस्कृती असते. ती तेथील परंपरेमुळे निर्माण झालेली असते. हे समजवताना लेखक म्हणतात की, पश्चिम महाराष्ट्राच्या एकाच पट्ट्यातील गावे एकसारखी नाहीत. त्यांची संस्कृती वेगळी आहे. कागल तालुक्यातील 'सागाव' हे पानमळ्याचे गाव म्हणून ओळखले जाते. 'सिद्धनेली' हे भात पिकवण्यासाठी प्रसिध्द आहे. 'कापशी' या गावातील सणगर समाजाचे लोक मोठ्या प्रमाणात घोंगड्यांचे उत्पन्न काढतात. सातारा जिल्ह्यातील एक गाव शिक्षकांचे गाव म्हणून ओळखले जाते. तेथील माणसे शिकून शिक्षक होण्याचा प्रथम प्रयत्न करत असतात. पुणेरी पगडी, पैठणचा शालू, जेजुरीचा भंडारा, पंढरपुरचा बुक्का, सोलापूरची चादर ही स्थानिक गावांची वैशिष्ट्ये आहेत. त्या त्या गावांच्या त्या त्या वस्तू प्रतिष्ठेच्या समजल्या जातात त्यामुळे ती त्यांची संस्कृती बनलेली दिसते.<br>दूधकट्ट्यावर सकाळच्या वेळी दुधाच्या धंद्यासाठी जाणाऱ्या म्हशी हे कोल्हापुरच्या संस्कृतीचे एक वैशिष्ट्य आहे. त्याच सकाळच्या वेळी पैलवानांचा समूहही दुधकट्ट्यावरील दूध पिऊन आखाड्यात मेहनत करतो. काही पैलवान पंचगंगेच्या घाटावर आंघोळीसाठी जातात. पंढरपुरच्या चंद्रभागा स्नानाला मात्र पावित्र्याचा स्पर्श आहे. दोन्ही गंगास्नानेच आहेत पण त्यामागची सांस्कृतिक भावना वेगळी आहे. पंढरपुरी संस्कृती वर्षातून दोनदा येणाऱ्या वारीवर बेतलेली आहे. ती विठ्ठलाच्या मंदिराच्या केंद्राभोवती निर्माण झाली आहे. त्याचबरोबर लाल लाल मातीच्या रस्त्यांचे देखणेपण आणि मासळी बाजारातील उग्र वास ही रत्नागिरीची ओळख आहे.<br>अशाप्रकारे वरील उदाहरणामुळेच 'गावाची संस्कृती स्थानिक परंपरांतून निर्माण झालेली असते' हे स्पष्ट होते.<br><br>❖❖❖❖ | **2** |